# मत्स्यमहाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरी ४१५६२९

टेलिफोन नंबर :(०२३५२)-२३२२४१

इ मेल: *adfishe.dbskkv@gov.in* *adfisheries@dbskkv.ac.in*


जा क्र/ममवि/एफआरइएसइ /प्रशिक्षण/ना.जे/निविदा/ / २०२३

दिनांक-:

प्रति.

**डॉ. बासाकोकृवि दापोली, वेबसाईटवर अपलोड करणेसाठी**.....

**विषय -: प्रशिक्षण कार्यक्रमात प्रशिक्षणार्थीना अल्पोपहार व भोजन पुरवठा करण्यासाठी दरपत्रक पुरविणे बाबत**...

**संदर्भ: जा.क्र. डॉ. बासाकोकृवि/विशि /६५/२०२३ दिनांक १७/०५/२०२३**

वरील संदर्भिय विषयान्वये संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. बा. सा. कोंकण कृषी विदयापीठ, दापोली यांनी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात मत्स्य महाविद्यालयात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षणाच्यावेळी प्रशिक्षणार्थ्यांना देण्यात येणाऱ्या चहा, नाश्ता व भोजनासाठी दरपत्रके मागविण्यास मंजुरी देण्यात अली आहे.

मत्स्य महाविद्यालय, शिरगाव रत्नागिरी येथे राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून उभारण्यात आलेल्या प्रशिक्षण केंद्रामध्ये सन २०२३-२४ (०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४) या वित्तीय वर्षामध्ये **यशदा, पुणे आणि इतर संस्थांकडून** मच्छिमार, मत्स्यसंवर्धक, शेतकरी, सरपंच, ग्रामसेवक , ग्रामविकास अधिकारी, फेडरेशन, बचत गटांचे सचिव आणि अध्यक्ष, बचतगट महिला, सुशिक्षित बेरोजगार तरुण तरुणी यांच्याकरीता प्रशिक्षण आयोजित केली जाणार आहेत. सदर प्रशिक्षण कार्यक्रमातील प्रशिक्षणार्थी, प्रशिक्षक, समन्वयक यांना खालील नमुद तपशिलानुसार अल्पोपहार व भोजन देण्यासाठी खालील नमूद केलेल्या तपशिला प्रमाणे आपली दरपत्रके बंद लाखोटातून दरपत्रके पोष्टाने अथवा हात-बावटाने निम्स्वाक्षरीतास या कार्यालयात पाठविण्यात यावीत.

| अल्पोपहार व भोजन तपशील घटक | दर प्रति घटक * (रुपये) | दर प्रति दिन (रुपये) |
|---|---|---|
| **अ) चहा प्रत्येकी १०० मिली** - सकाळी (प्रशिक्षण वेळेत दोन वेळेस चहा/कॉफी/दूध(१०० मिली) देण्याची व्यवस्था करावी.) | | |
| **ब) सकाळचा नाश्ता**- पोहे/शिरा/उपमा /पुरी-भाजी /मिसळ /वडा सांबर /अंडी, ब्रेड बटर यापैकी दोन (प्रत्येकी १५० ग्रॅम) व हंगामानुसार एक फळ याप्रमाणे दररोज अदल-बदल करून द्यावा व नाष्ट्या सोबत चहा/कॉफी (१०० मिली) द्यावी. | | |
| **ड) दुपारचे व रात्रीचे जेवण**: १ वाटी सुकी भाजी, १ वाटी पातळ भाजी (प्रत्येकी १०० ग्रॅम भाजी), ३ चपाती, भात ( प्रत्येकी १५० ग्रॅम) डाळ (प्रत्येकी १५० ग्रॅम) पापड ( प्रत्येकी १ नग) लोणचे (प्रत्येकी १५ ग्रॅम); १ स्वीट डिश (जिलेबी, गुलाब जामून/ श्रीखंड/ खीर/ फ्रुट सॅलेड यापैकी एक परंतु ज्यांना स्वीट डिश नको असेल त्यांना एक फळ देण्यात यावीत). प्रशिक्षणार्त्यांचा उपवास असेल तर खिचडी /साबुदाणा वडा /भगर भात यांचेसह फळे इत्यादी | | |

* तुलनात्मक दृष्ट्या प्रति घटक दर कमी असला तरी अंतिम निविदा/दरपत्रक “प्रति दिन दराप्रमाणेच” स्वीकारले जातील.

तरी आपणास विनंती करण्यात येते की वर नमूद केल्या प्रमाणे पुरवठा करण्यासाठीचा कमीत कमी आणि स्पर्धात्मक दर निविदे मध्ये नमुद करून, खालील अटी व शर्थीना अधीन राहून खाली दिलेल्या पत्यावर विहित मुदतीत दरपत्रक सादर करावी.

१)निविदा बंद लिफाफ्या मध्ये व लिफाफा व्यवस्थित चिकटवून, तसेच लिफाफ्यावर "**मत्स्य विस्तार शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम - चहा-नाश्ता व जेवण पुरविणे**" असे लिहून व अधोरेखित करून पोस्टाने किंवा कूरियरने अथवा हात-बावटा प्रत्यक्ष कार्यालयात येऊन विहित मुदतीत सादर करावी. पोष्टाद्वारे निविदा मिळण्यास उशीर झाल्यास अथवा मुदतीनंतर प्राप्त झालेली निविदा/दरपत्रके स्वीकारण्यात येणार नाहीत व त्या करिता हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

२) निविदा/दरपत्रके सर्व करासहित देण्यात यावेत. सर्व करांचा स्पष्ट उल्लेख असावा, तसेच नमुद केलेला दर मत्स्यमहाविद्यालय शिरगाव रत्नागिरी येथे पोहोच असावा, तसेच प्रशिक्षण कालावधीत सूचनेप्रमाणे उपरोक्त जेवण प्रशिक्षणार्थीना वाढावयाचे आहे.

३) देयकाबाबत काही अटी असल्यास त्याचा स्पष्ट उल्लेख असावा. पुरवठा केलेल्या मालाचे देयक पुरवठा केल्यानंतर मिळेल. वितीय संस्थेच्या कोणत्याही प्रकारच्या औपचारिक परिपूर्ततेस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

४) देयकासाठीच्या डिमांड ड्राफ्टचे कंमिशन, पोस्टेज खर्च पुरवठादाराला स्वतः करावयाचा आहे.

५) निविदे सोबत फूड अँड ड्रुग्स किंवा फसाट चे प्रमाणपत्र, पॅनकार्ड, तसेच जीएसटी प्रमाणपत्र किंवा जीएसटी प्रमाणपत्र नसल्यास, नॉन जिएसटी सर्टिफिकेट अथवा त्याबाबतचे घोषणापत्र जोडणे अनिवार्य आहे.

६) **निविदेमधील दर ३१ मार्च २०२४ पर्यंत लागू राहतील**.

७) कोणतेही कारण न देता आपल्या एकमेव स्वेच्छाधीकारावर दरपत्रक/निविदा रद्द करण्याचे/दुरुस्त करण्याचे किंवा नियत तारीख वाढविण्याचे निविदा स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे पूर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकाराना असून हे अधिकार हे कार्यालय राखून ठेवीत आहे.

८) गुणवत्ता व चाचणी करूनच जेवण पुरविण्यात यावे.

९) खाद्य पदार्थांची चव उत्तम दर्जाची असावी, नीट-नेटकेपणा आणि सफाई- स्वच्छता असणे आवश्यक आहे. खाद्य पदार्थ बनविणारे आणि वाढणारे यांचे आरोग्य उत्तम असावे.

१०) आपली निविदा पूर्णपणे भरून व सर्व बाबींची पूर्तता करून **०९ जुन २०२३** कार्यालयीन वेळेपुर्वी खाली दिलेल्या पत्यावर पाठवावी.

**सहयोगी अधिष्ठाता**,
**मत्स्यमहाविद्यालय,**
**शिरगाव**, **ता.** जि. **रत्नागिरी - ४१५६२९, महाराष्ट्र**.

कळावे

**आपला विश्वासू**



**सहयोगी अधिष्ठाता**
मत्स्यमहाविद्यालय,शिरगाव, रत्नागिरी